तहसिल कार्यालय औरंगाबाद
जिल्हाधिकारी कार्यालय मागे फाजलपुरा, औरंगाबाद
फोन नं ०२४०-२३३४७२८ E-Mail tahsildarabad@gmail.com

जा.क्र.२०१७/जमा-२/एनए-परि-ब-सनद/प्र.क्र.१० दिनांक २२/०९/२०१७

वाचा :-
१.शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रमांक : एनएपी-२०१६/प्र.क्र.७/टी-१,दिनांक २२ जानेवारी २०१६
२.सहयोगी नियोजनकार, औ.झा क्षे सिडको, नवीन औरंगाबाद यांचे पत्र क्रं सिडको/ टिपीओ/ ऐएफऐ-जीएच/२०१७-७७ दिनांक ११/०९/२०१७.
३.अर्जदार मेघा लॅण्डमार्क एल.एल.पी. तर्फे भागीदार १.श्री.प्रदीप केशरलाल ढाकरे व इतर ६, रा द्वारा धनंजय बी डोईफोडे,फॅल्ट नं बी-९, शिवगया कॉम्प्लेक्स, गारखेडा, औरंगाबाद यांचा अर्ज दिनांक १९/०९/२०१७.

## परिशिष्ट "ब"
## महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम-४२ अ मधील तरतुदींन्वये नियोजन प्राधिकरणाने बांधकाम / विकास परवानगी दिली आहे, अशा जमिनीच्याा भोगवटदारास द्यावयाच्या सनदेचा नमुना.

ज्याअर्थी, जिल्हा औरंगाबाद तालुका औरंगाबाद मौजे सांवगी च्या सर्व्हे क्र./गट नं. /न.भू.क्र. १७५ **(pt)** क्षेत्रफळ ५१००.०० चौ.मी. या जमिनीच्या भोगवटादाराने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४२-अ च्या तरतुदींन्वये निवासी अकृषिक प्रयोजनासाठी सदर जमिनीचा विकास करण्यास वरिष्ठ नियोजकार (न.श) सिडको, नविन औरंगाबाद या नियोजन प्राधिकरणाच्या आदेश क्र.सिडको/टिपीओ/ऐएफऐ-जीएच/२०१७-७७ दिनांक ११/०९/२०१७ अन्वये विकास/बांधकाम परवानगी प्राप्त केली आहे, ज्या संबंधी नियोजन प्राधिकरणाने मंजूर केलेला नकाशा या सनदे सोबत संलग्न आहे.

ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या भोगवटादाराने शासनाला, उक्त संहितेच्या कलम ४७-अ नुसार देय रुपांतरण कराची व वर नमूद अकृषिक प्रयोजनार्थ वापरापोटी आकारणीची रक्कम

रुपये २७,५४०/- (अक्षरी- सत्तावीस हजार पाचशे चाळीस रुपये फक्त) चालान क्रं GRN MH००५५८३३१६२०१७१८M चालानद्वारे दिनांक २१/०९/२०१७ रोजी भरणा केला आहे.

त्याअर्थी आता, उक्त संहितेमधील तरतुदीच्या आणि तद्न्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींना आणि खालील शर्तींना अधिन राहून उपरोक्त जमिनीच्या भोगवटादारास सदर नियोजन प्राधिकाऱ्याच्या वर उल्लेखित विकास / बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने सदर जमिनीवर अनुज्ञेय करण्यात आलेल्या अकृषिक वापरापोटी उक्त संहितेच्या कलम ४२-अ अन्वये ही सनद देण्यात येत आहे.

१. आकारणी : उक्त जमिनीचा भोगवटादार उक्त जमिनीच्या संबंधात या अगोदर वसुली योग्य असलेल्या आकारणी ऐवजी वर उल्लेखित विकास / बांधकाम परवानगी प्राप्त झाल्यापासून दि. ३१ जुलै २०१८ रोजी संपणाऱ्या हमीच्या कालावधीत शासनाला प्रत्येक वर्षी रु. ०.९० पैसे प्रती चौ.मी. या दराने परिगणित होणारी वार्षिक आकारणी देईल आणि उक्त कालावधी संपल्यानंतर, उक्त संहिते अन्वये जिल्हाधिकाऱ्याकडून, वेळोवेळी निश्चित करण्यात येईल, अशी सुधारित आकारणी देईल.

२. उक्त जमिनीचा भोगवटादार उक्त जमिनीवर वसुली योग्य असलेले सर्व कर, दर आणि उपकर भरील.

३. वरीलप्रमाणे मंजूर केलेल्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये नियोजन प्राधिकरणाच्या पुर्व मंजूरीशिवाय कोणताही बदल करुन नये व ही सनद निर्गमित झाल्यानंतर नियोजन प्राधिकरणाच्या पूर्व मान्यतेने सदर जमिनीच्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये कोणताही बदल झाल्यास त्याची माहिती, असा बदल नियोजन प्राधिकरणाकडून मंजूर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत जिल्हाधिकारी यांना देणे भोगवटादारावर बंधनकारक राहील.

४. उक्त जमिनीच्या भोगवटादाराने पूर्वगामी शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास जिल्हाधिकाऱ्यास, उक्त संहितेच्या आणि तद्न्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींअन्वये जी भरण्यास उपयोगकर्ता दायी असेल अशी इतर कोणत्याही शास्तीस बाधा न आणता त्यास योग्य वाटेल अशी आकारणी भरल्यावर आणि कलम ३२९ च्या पोट कलम (२) च्या अधीनतेने, त्यास योग्य वाटेल एवढा दंड भरल्यावर उक्त जमीन भोगवटादार याच्या वहिवाटीत असण्याचे चालू ठेवता येईल. त्याची साक्ष म्हणून तहसिलदार औरंगाबाद या ठिकाणी

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने स्वाक्षरी केली आहे आणि त्यांच्या पदाची मोहोर लावली आहे आणि अर्जदाराने सुध्दा दिनांक २२/०९/२०१७ रोजी त्याची स्वाक्षरी येथे केलेली आहे.

१.मेघा लॅण्डमार्क एल.एल.पी.तर्फे
भागीदार श्री.प्रदीप केशरलाल ढाकरे व इतर ०६ x

(सतिश सोनी)
तहसिलदारऔरंगाबाद

(साक्षीदारांच्या स्वाक्ष-या)

१) सतिष लिंबाजी मेटे

२) आदिनाथ रामदास मेटे

आम्ही जाहीर करतो की, या सनदेवर स्वत: श्री.संतोष रामराव शेरकर यांनी आमच्या समक्ष स्वाक्षरी केलेली आहे.

(सतिश सोनी)
तहसिलदार औरंगाबाद

::प्रतिलीपी::

१.मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
२.मा.उपविभागीय औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
३.वरिष्ठ नियोजकार (न.श) सिडको, नविन औरंगाबाद यांना माहितीस्तव.
४.मंडळ अधिकारी चौका/तलाठी साझा चौका ता.जि.औरंगाबाद यांना कार्यवाहीस्तव.
५.संबंधितास अनुपालनास्तव प्रत देण्यात येते.

तहसिलदार औरंगाबाद

THE TAHSILDAR